# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२८३/२०१०/१०

तक्रार दाखल दिनांक :- ०५/०४/२०१०
निकाल दिनांक :- ०१/०६/२०१०

श्री देवराव नाथुजी गल्हाटे,
रा.घर नंबर आय/१५,शिवशंकर कॉलनी,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००१०४२३८८८) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
|---|---|---|
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०५/०४/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २०/०४/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहक महाविरतण कंपनीचे कर्मचारी असून त्यांनी घरगुती वापरासाठी सन १९८३ पासुन वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९००१०४२३८८८ असा आहे.ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन देण्यात आलेल्या वीज देयक वेळोवेळी भरलेली आहेत.ग्राहकास माहे जानेवारी २००८ पर्यंत मीटर रिडींग नुसार १५० ते २०० युनिट वीज वापराचे देयक येत होते. परंतु माहे फेब्रुवारी २००८ ते मे २००८ या कालावधीमध्ये अवास्तव रक्कमेचे वीज देयक देण्यात आले.वरील अवास्तव वीज देयकाबाबत ग्राहकाने महावितरण कंपनीचे संबंधित उपविभागीय कार्यालयात अनेक तक्रारी दाखल केलेल्या आहेत.त्यांच्या तक्रारीनुसार महावितरण कंपनीने माहे जुन २००८ मध्ये जुने ४४५४५ क्रमांकाचे मीटर बदली करुन नवीन मीटर क्रमांक १६८१५२८ बसवुन दिले.नवीन मीटरनुसार ग्राहकाचा सरासरी वीज वापर पर्वीप्रमाणे १५० युनिट प्रतिमाह येत आहे. ग्राहकाने वरील नादुस्त मीटरची चाचणी करण्याची लेखी विनंती महावितरण कंपनीस केली परंतु मीटरची चाचणी ग्राहकाच्या समोर न करता मीटर योग्य असल्याचा अहवाल देण्यात आला. मीटरचा सदोष अहवाल देण्यासाठी महावितरण कंपनीच्या संबंधित कर्मचा-यांनी पैसाची मागणी केली. परंतु ती पुर्ण न केल्यामुळे नादुरुस्त मीटर योग्य असल्याचे दाखविण्यात आले आहे असे ग्राहकाने तक्रारीमध्ये नमुद केले आहे.ग्राहकाने मंचात तक्रार दाखल करुन माहे फेब्रुवारी ते जुन २००८ या कालावधीत महावितरण कंपनीने दिलेले वीज देयके रद्द करुन नविन मीटरचे वापरानुसार वरील

कालावधीकरीता वीज आकारणी करावी, व्याज व दंड माफ करावे अशी विनंती मंचास केली.

२) वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक २०/०४/२०१०,०४/०५/२०१० व १८/०५/२०१० रोजी घेण्यात आली.सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी श्री एच.आर.शहा,श्री एस.जी.भारती, श्रीमती आर. अे. कुलकर्णी उपकार्यकारी अभियंता गारखेडा तसेच वीज ग्राहक श्री डी.एन.गल्हाटे उपस्थित होते. ग्राहकाने त्यांची तक्रार वरील प्रमाणे कथन केली.नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल.,मीटर बदली अहवालाची प्रत, मीटर चाचणी अहवालाची प्रत व स्थळ निरिक्षण अहवाल तसेच आपले लेखी निवेदन मंचात सादर केले.त्यांच्या निवेदनानुसार ग्राहकास माहे फेब्रुवारी ते मे २००८ या कालावधीत मीटर रिडींगनुसार वीज देयक देण्यात आली असून ग्राहकाचे तक्रारीनुसार त्यांचे मीटर बदली करुन देण्यात आल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी वरील कालावधीमध्ये ग्राहकाचा वीज वापर पुर्वी पेक्षा जास्त आल्याचे मान्य करुन ग्राहकाचे विनंती नुसार त्याचे मीटरची चाचणी करण्यात आली व चाचणीनुसार मीटर योग्य गतीने फिरत असल्याचे आढळुन आल्यामुळे दिलेले वीज देयक योग्य असल्याचे सांगीतले. नोडल अधिकारी यांनी म.रा.वीज नियामक आयोग विनियम २००५ चे कलम १५.४.१ नुसार फक्त मीटर नादुरुस्त अथवा बंद असल्याच्या स्थितीमध्येच सरासरी आकारणीची तरतुद असल्याचे सांगुन या प्रकारणामध्ये मीटर, चाचणी अहवालानुसार योग्य असल्यामुळे नवीन मीटरच्या वीज वापराप्रमाणे सरासरी युनिट आकारणी करण्याबाबत ग्राहकाने केलेली विनंती फेटाळुन लावावी अशी मंचास विनंती केली.ग्राहकाने त्यांचा वीज वापर वादग्रस्त कालावधी (फेब्रुवारी २००८ ते जुन २००८ ) सोडुन २०० युनिट प्रति महा पेक्षा जास्त वीज वापर कधीही नव्हता व नाही त्यामुळे वरील मीटर नादुरुस्त असुन जलदगतीने फिरत होते असे सांगीतले.वरील मीटरची तक्रार केल्यानंतरही त्याची चाचणी आपल्या समक्ष न केल्यामुळे त्या मीटर फेर चाचणी करण्याचे आदेश देण्याबाबत विनंती मंचास केली.मंचाने नोडल अधिकारी यांना मीटर क्रमांक ४४५४५ ची फेर चाचणी ग्राहकाच्या समक्ष

करुन त्याचा अहवाल ७ दिवसांच्या आंत सादर करण्यास सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

३) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की,जानेवारी २००८ पर्यत ग्राहकाची वीज बिलाबाबत कोणतीही तक्रार नव्हती. ग्राहकाच्या सी.पी.एल.नुसार माहे नोव्हेबर २००७ ते फेब्रुवारी २००८ पर्यतच्या कालावधीत मीटर लॉक स्टेटस दाखवत सरासरी १६२ युनिट प्रति महा प्रमाणे आकारणी केल्याचे दिसुन येते.माहे फेब्रुवारी २००८ मध्ये मागील रिंडींग १२७० व चालु रिडींग ६८९५ दाखवुन ५६२५ युनिटचे एकत्रीत बिल रुपये ३१८१०.९७ देण्यात आले. तसेच माहे मार्च २००८ ते जुन २००८ या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे मीटर रिडींग न घेता सरासरी आकारणीची वीज देयके देण्यात आली.

| महीना | वीज वापर |
|---|---|
| मार्च २००८ | ९७० युनिट |
| एप्रिल २००८ | १०३१ युनिट |
| मे २००८ | ११०९ युनिट |
| जुन २००८ | ११०९ युनिट |

वरील अवास्तव वीज बिलाबाबत ग्राहकाने महावितरण च्या उपविभागीय कार्यालयास दिनांक ११/०४/२००८,२५/०४/२००८ व ०६/११/२००८ रोजी लेखी तक्रारी दाखल केल्याचे दिसुन येत आहे.वरील तक्रारीवरुन त्यांचे वादग्रस्त मीटर क्रमांक ०४४५४५ दिनांक १०/०६/२००८ रोजी बदली करण्यात आले.व त्यामीटरची चाचणी दिनांक ०४/०७/२००८ रोजी करण्यात येवुन मीटर योग्य गतीने फिरत असल्याचे आढळुन आले.कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक २६/०१/२००९ रोजी केलेल्या स्थळ निरिक्षण अहवालावरुन ग्राहक १.४३५ कि.व्हॅट वीज भार वापरत असुन ग्राहकाचा

आंदाजीत वीज वापर ६० युनिट प्रति महा असल्याची नोंद केली आहे.सी.पी.एल.चे निरिक्षण केले असता असे दिसुन येते ग्राहकाचे वरील वादग्रस्त मीटर क्रमांक ०४४५४५ माहे मार्च २००७ रोजी बसविण्यात आले.त्या मीटरद्वारे माहे मार्च २००७ ते ऑक्टोबर २००७ या कालावधीत ग्राहकाचा वीज वापर सरासरी १७५ ते २०० युनिट झालेला दिसुन येतो. तसेच नोव्हेबर २००७ ते जुन २००८ या कालावधीमध्ये वरील मीटरचा वापर सरासरी ८१४ युनिट प्रति माह झालेला दिसुन येत आहे. जो ग्राहकाचे वीज भारानुसार अतिशय जास्त आहे. नविन मीटर क्रमांक १६८१५२८ माहे जुन २००८ मध्ये बसविण्यात आल्यानंतर त्याचा वीज वापर सरासरी १५० युनिट असल्याचे दिसुन येत आहे. वरील माहीतीवरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचा वीज वापर नोव्हेबर २००७ ते जुन २००८ या कालावधीमध्ये अवास्तव नोंद झाल्याचे दिसुन येते.

ग्राहकाने मीटर क्रमांक ०४४५४५ जलद गतीने फिरत असल्याची तक्रार महावितरण कंपनीकडे दिल्यानंतर वरील मीटर ग्राहकाच्या समक्ष तपासणी करणे गरजेचे होते परंतु मीटरची चाचणी मीटरची चाचणी ग्राहकाच्या समक्ष घेण्यात आली नाही.मंचाने नोडल अधिकारी यांना वरील वादग्रस्त मीटरची पुर्नचाचणी ग्राहकाच्या समक्ष घेण्यास सांगीतले असता वरील मीटर उपलब्ध नसल्याचे मंचास कळविण्यात आले.

वरील सर्व विवेचणावरुन व प्राप्त पुराव्यावरुन ग्राहकाचा माहे नोव्हेबर २००७ ते जुन २००८ या कालावधीतील मीटरचे वाचण अवास्तव असल्यामुळे ते ग्राह्य धरणे संयुक्तीक होणार नाही असे मंचाचे मत आहे. त्यामुळे माहे नोव्हेबर २००७ ते जुन २००८ या कालावधीकरीता पुर्वीचा महत्तम वीज वापर ग्रहीत धरुन सरासरी पध्दतीने वीज आकारणी करणे योग्य होईल.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे नोव्हेबर २००७ ते जुन २००८ या कालावधीत केलेली वीज आकारणी रद्द करण्यात येत आहे.त्या ऐवजी वरील कालावधीकरीता सरासरी २०० युनिट प्रति महा प्रमाणे वीज आकारणी करुन सुधारीत वीज देयक ग्राहकास द्यावे.

२) वरील सुधारीत वीज देयकात कोणतेही व्याजाची व दंडाची आकारणी करु नये.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |